# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 09 February 2025
Time 7.10 AM to 7.20 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल पराभूत
- प्रसारमाध्यमांनी सर्जनशीलपणे काम करण्याची आवश्यकता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून व्यक्त
- लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्यापासून सन्मान निधी वितरित केला जाणार नाही – मंत्री आदिती तटकरे यांची माहिती
- मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांचा १५ फेब्रुवारीपासून पुन्हा उपोषणाचा इशारा

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये २५ सुवर्णपदकांसह महाराष्ट्राकडे सर्वाधिक ११३ पदकं

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. पाच तारखेला झालेल्या या निवडणुकीची काल मतमोजणी झाली, यात भाजपला ४८ जागांवर विजय मिळाला, तर सत्ताधारी आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावं लागलं. काँग्रेस पक्षाला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. नवी दिल्ली मतदार संघातून आम आदमी पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला. भाजपचे प्रवेश वर्मा यांनी केजरीवाल यांना चार हजार ८९ मतांनी पराभूत केलं. तर जंगपुरा मतदार संघातून आपचे मनीष सिसोदिया यांचा भाजपचे तरविंदरसिंह मारवाह यांनी अवघ्या ६७५ मतांनी पराभव

केला. दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी कालकाजी मतदार संघातून भाजपचे रमेश बिधुडी यांच्यावर तीन हजार ५२१ मतांनी विजय मिळवला.

दरम्यान, २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा दिल्लीत सत्तेत येत असल्यामुळे भारतीय जनता पक्षात आनंदाचं वातावरण आहे. भाजपच्या दिल्ली कार्यालयासह अनेक ठिकाणच्या कार्यालयात काल कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि मिठाई वाटून विजय साजरा केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा विकास आणि सुशासनाचा विजय असल्याचं म्हटलं आहे. काल दिल्लीत भाजप मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी मतदारांचे आभार मानत, दिल्लीला विकसित भारताची विकसित राजधानी करणार असल्याचं सांगितलं. दिल्लीवासियांच्या सेवेसाठी अधिक सक्षमपणे काम करण्यास कटिबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिल्ली निकालावरून आम आदमी पक्षावर टीका केली आहे. केजरीवाल यांची भाषा प्रामाणिकपणाची असली, तरी प्रत्यक्ष कृती मात्र वेगळी होती. मतदारांनी हा फरक ओळखला आणि म्हणूनच केजरीवाल यांची मतं घसरली, असं हजारे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, उत्तरप्रदेशात मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे चंद्रभानु पासवान यांनी समाजवादी पार्टीचे अजित प्रसाद यांना ६१ हजाराहून अधिक मतांनी पराभूत केलं. तर तमिळनाडूत इरोड विधानसभा पोटनिवडणुकीत द्रविड मुन्नेत्र कळघमचे चंधीरकुमार व्ही सी यांनी आपल्या विरोधकांवर ९१ हजाराहून अधिक मतांनी विजय मिळवला.

****

प्रसारमाध्यमांनी सर्जनशील राहून काम करणं आवश्यक असून, जलदगतीने बातमी देत असताना माहितीच्या मुळाशी जाण्याची आणि खात्री करून घेण्याची वृत्ती तसंच गांभीर्य माध्यमांनी जपले पाहिजे, असं आवाहन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. काल पुण्यात राज्यातल्या पहिल्या 'जयपूर डायलॉगच्या डेक्कन समिट कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर आणि जयपूर डायलॉगचे प्रमुख संजय दीक्षित यांनी फडणवीस यांच्याशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. जयपूर डायलॉगच्या चांगल्या कार्यासाठी शासन कायम पाठीशी राहिल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्यापासून सन्मान निधी वितरित केला जाणार नसल्याचं, महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. मात्र, अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या काळात वितरित झालेला निधी परत घेतला जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, सरकारने लाभार्थी बहिणींना अपात्र ठरवण्याची कृती म्हणजे लाडक्या बहिणींशी केलेली गद्दारी आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. ते काल मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

****

ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन केलेले सावंत यांना, विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले. सावंत यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दु:ख व्यक्त केलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या १५ फेब्रुवारीपासून अंतरवाली सराटी इथं पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. ते काल अंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलत होते. दोन दिवसांमध्ये मराठा समाजबांधवांशी चर्चा करून मुंबईत मोर्चा काढण्याबाबत निर्णयही घेतला जाईल, असंही त्यांनी सांगितलं. यापूर्वीचं सातवं आमरण उपोषण स्थगित करताना आपल्या चार मागण्या तत्काळ मंजूर करण्यात येतील, असं आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सांगितलं होतं. मात्र, पंधरा दिवस उलटून गेल्यावरही काहीच निर्णय झाला नसल्याकडे जरांगे यांनी लक्ष वेधलं.

****

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे आणि साधना आमटे यांच्या रुपाने आपण सर्वांनी देव पाहिला आहे, असं सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आनंदवन इथं दोन दिवसीय मित्रमेळाव्यात ते काल बोलत होते. काल सकाळी वृक्षदिंडीने मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. या निमित्ताने अनेक कार्यक्रम, परिसंवाद तसंच चर्चा होणार आहेत.

****

शेतकऱ्यांना कृषीक्षेत्रात काळानुरूप होणारे बदल स्वीकारावे लागणार असल्याचं, जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. राहाता तालुक्यातल्या राजुरी इथं `डाळींब बहार मेळावा` आणि `कृषी प्रदर्शनाच्या` उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाचं धोरण उपयुक्त ठरेल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला.

****

मराठवाड्यात सर्व जिल्हा परिषद कार्यालयांनी शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिशील प्रशासन राबवून आवास योजना, लखपती दीदी योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करावेत, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहेत. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं ग्रामविकास पंचायत राज विभागाच्या आढावा बैठकीत बोलत होते. उमेदमार्फत बचत गटातून उत्पादित झालेल्या वस्तूंचं प्रदर्शन आणि विक्रीसाठी प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येणार असल्याचं गोरे यांनी सांगितलं, ते म्हणाले…

> ***“महिला आता खाद्य पदार्थांच्या पलिकडे जाऊन बचतगटाच्या माध्यमातून खूप चांगले प्रॉडक्टस् बनवतायत आणि खूप चांगलं मार्केटींग करतायत. त्याही संदर्भात आम्ही आढावा घेतला. आणि सरसच्या माध्यमातून जिल्ह्याला आम्ही एक्झिबिशेन घेतो आणि त्यातून महिलांच्या उत्पादनाला मार्केट तयार करून देतो. आणि चार दिवसाच्या त्या कार्यक्रमामध्ये किमान पन्नास, साठ, सत्तर लाखाचं महिलांच्या तयार केलेल्या उत्पन्नाचं मार्केटींग होतं. आणि त्यातून महिलांना उत्पन्न मिळतं. आणि हा विषय आम्ही बघितल्यानंतर एक लक्षात आलं, त्या महिलांना जर कायम स्वरूपी मार्केट आपण तयार करून दिलं, सुरवातीला जिल्हा लेव्हलला. यातून खूप महिलांना स्वतःच्या पायावर उभं राहता येईल. म्हणून आम्ही प्रत्येक जिल्ह्याला एक उमेद मॉल बांधण्याचा नव्यानं सकल्प केलेला आहे.”***

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पदकांची शंभरी पार केली. महाराष्ट्राकडे सर्वाधिक ११३ पदकं असून, त्यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. महिला मुष्टियुद्धात दिव्या पवारनं ४५

किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं, तर पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत, तामिळनाडूनं कर्नाटकला हरवून अव्वल स्थान पटकावलं.

या स्पर्धेत परभणी जिल्हा ॲथलेटीक्स संघटनेचा खेळाडू किरण मात्रे याने १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक पटकावलं. किरण हा परभणी तालुक्यातल्या त्रिधारावाडी इथला रहिवासी असून सध्या सेनादलात कार्यरत आहे.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यात एक दिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज ओडिशात कटक इथं होणार आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत पहिला सामना जिंकून भारत एक – शून्यने आघाडीवर आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या स्वागत उपक्रमात काल ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक श्रीकांत सराफ तसंच लेखक माणिक पुरी यांचं व्याख्यान झालं, सराफ यांनी आपल्या तितरबितर या पुस्तकाबद्दल तर पुरी यांनी पक्षी येती अंगणी या पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केलं.

****

बीड जिल्ह्यात माजलगाव तालुक्यातल्या टाकरवन जवळच्या फुलसिंगनगर तांड्यावर काल खिचडी खाल्ल्याने ११ बालकांना विषबाधा झाल्याची घटना घडली. या बालकांवर माजलगाव इथल्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ. मधुकर घुबडे यांनी दिली.

****

नांदेड जिल्ह्यात गोदावरी काठावर होणारी वाळूची अवैध साठवणुक आणि वाळू उपशावर प्रशासनाने कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत तीनशे ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून, नदीकाठालगत विविध गावांमधला अवैध वाळू साठा गेल्या तीन दिवसांपासून जप्त करून कारवाई सुरू आहे.

****

आय डी बी आय बँकेच्या सी एस आर फंडातून छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या संगणक प्रयोगशाळेसाठी फर्निचर उपलब्ध करून देण्यात आलं आहे. काल या कक्षाचं बँकेचे महाव्यवस्थापक रवी असवानी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आलं.

****